(CNRMHSN110005692022)

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२४१/२०२२ निशाणी २१ लगत सरतपास</u>**

फिर्यादीने आपल्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात पुराव्यात कागद दाखल करण्याबाबतचे कथन केलेले आहे. आरोपीचे वकील हजर आहेत. युक्तीवाद ऐकला.

सबब खालील आदेश करण्यात येतो –

**१०.** या कामी निशाणी ३/१ कडे फिर्यादीने धनादेश क्र.२२६१६८ सादर केलेला आहे. त्या धनादेशावरील आरोपीची सही त्याने ओळखली आहे व तो त्यांना दिला असल्याचे सांगितले आहे. (**सदर धनादेशाला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियम १८८१ चे कलम ११८ व १३९ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.२४ देण्यात येते**.) निशाणी ३/२ कडे धनादेश अनादरीत झाल्यामुळे आय.डी.बी.आय. या बँकेचा मूळ मेमो सादर केला आहे. (**सदर मेमोला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियमचे कलम १४६ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.२५ देण्यात येते.)**

११. निशाणी ३/३ कडे आरोपीला दिलेली नोटीस हजर केलेली असून त्याच्यावरील सही साक्षीदाराने ओळखलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (**सदर नोटीसला निशाणी क्र.२६ देण्यात येते.)**

**१४.** निशाणी ३/४ येथे आरोपीला पाठविलेल्या नोटीसची पोहोचलेची पोस्टाची पोहोच पावती आहे. त्यावर पोस्टाचा शिक्का आहे. **(त्यास निशाणी क्र.२७ देण्यात येते.)**

**<u>आरोपीच्या वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब</u>**

VINAYAK DATTATRAY PATIL
Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2023.01.05 10:37:34 +0530

आटपाडी (वि. द. पाटील)

दिनांक : ०४/०१/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आटपाडी